## श्री विष्णूची आरती

संतसनकादिक भक्त मिळाले अनेक ।
स्वानंदें गर्जती पाहूं आले कौतुक ।। १ ।।

नवल होताहे आरती देवाधिदेवा ।
स्वर्गींहुनी सुरवर पाहूं येती केशवा ।। धृ ।।

नर नारी तटस्थ टक पडिलें नयना ।
ओवाळीतां श्रीमुख धणी न पुरे मना ।। नवल ।। २ ।।

एका जनार्दनीं मंगल आरत्या गाती ।
मंगल कौतुकें गाती ।
मिळाले वैष्णव जयजयकारें गर्जती ।। नवल ।।३ ।।